महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२०

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२० / फाल्गुन २१, १९४१ (शके)

(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री
(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री
(३) अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री
(४) शालेय शिक्षण मंत्री
(५) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री
(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री
(७) परिवहन, संसदीय कार्य मंत्री
(८) पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ३८

दुष्काळी भागातील तरुणांना राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेत सामावून घेण्याबाबत

(१) * ५२२१ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने दुष्काळी भागातील तरुणांना नोकरी देण्यासाठी माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये घेतलेल्या लेखी परिक्षेत ६०,३८७ उमेदवारांपैकी २८,१७३ उमेदवार उत्त्तीर्ण झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना अद्यापही महामंडळाने सेवेत सामावून घेतले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना सेवेत सामावून घेण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सेवेत सामावून घेण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब : (१) माहे फेब्रूवारी, २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या चालक तथा वाहक पदाच्या सरळसेवा लेखी परीक्षेस २९,१९२ उमेदवारांपैकी २४,५२६ उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत.
(२) व (३) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी करून अंतीम निवड यादीतील २३७२ उमेदवारांपैकी १०६४ उमेदवारांचे सेवापुर्व प्रशिक्षण सुरु असून उर्वरीत उमेदवारांना टप्प्याटप्याने सेवापुर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे.
तसेच सेवापुर्व प्रशिक्षण पुर्ण झालेल्या २२२ उमेदवारांना महामंडळाद्वारे नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील कारखान्यामुळे होत असलेले वायु प्रदुषण

(२) * ५५२६ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील कारखान्यातून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर योग्य निकषांच्या आधारे प्रक्रिया करण्यात येत नसल्याने प्रक्रिया केंद्राचे आधुनिकीकरण करण्याचे

आदेश सन २०१७ मध्ये हरित लवादाने देवूनही कार्यवाही होत नसून डोंबिवली शहरातील औद्योगिक विभागातील फेज-१ परिसरातील रहिवाश्यांना माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान वायूप्रदूषणाचा त्रास झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे : (१) • महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने डीबीइएसए (Dombivali Better Environment System Association) या १६.० एमएलडी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेच्या आधुनिकरणाचा प्रस्ताव मान्य केला असून निविदा प्रक्रियेचे काम प्रगती पथावर आहे.

• डोंबिवली शहरातील औद्योगिक विभागातील फेज १ परिसरातील नागरिकांना नोव्हेंबर-डिसेंबर, २०१९ मध्ये वायूप्रदूषणाचा त्रास होत असल्याबाबतच्या तक्रारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाल्या होत्या.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने

अ) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पाहणीदरम्यान महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूमिगत गटारातून औद्योगिक सांडपाणी नाल्यामध्ये येत असल्याचे आढळून आले होते. याबाबत, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास दिनांक १५/११/२०१९ रोजी निर्देश देण्यात आले आहेत.

आ) तसेच पाहणीदरम्यान नाल्यात आढळलेले रसायन/पदार्थ कल्याण अंबरनाथ उत्पादक संघटना व कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या मदतीने काढण्यात आले होते.

इ) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान अज्ञात इसमाकडून रात्री / अपरात्री टँकरव्दारे रासायनिक पदार्थ खंबाळपाडा येथील पावसाळी नाल्यामध्ये बेकायदेशीररित्या सोडल्याचे आढळून आले होते. त्यानुषंगाने अवैधरित्या रसायनांची वाहतूक करणाऱ्या

टँकर चालकाविरुध्द दिनांक २०/११/२०१९ रोजी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने टिळक नगर पोलीस स्टेशन व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे शेलार (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील बेकादेशीर कारखान्यांमुळे होत असलेले प्रदुषण

(३) * ६४९२ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शेलार (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील परिसरात अनधिकृत बांधकाम करुन कारखाने सुरु करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनधिकृत कारखान्यांमधील डाईंगचे रसायनयुक्त पाणी कामवरी नदीपात्रात सोडण्यात येत असल्यामुळे नदीचे पाणी दुषित होवून रोगराई पसरुन शेतकऱ्यांच्या शेतपिकाचे ही नुकसान झाले असून वायु प्रदुषणामुळे नागरीकांना श्वसनाचा त्रास होत असुन हृदयरोगाच्या आजारातही वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषी कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे : (१) मौजे शेलार (ता.भिवंडी, जि.ठाणे) परिसरातील उद्योगांमधून प्रदूषण होत असल्याबाबतची तक्रार माहे जानेवारी, २०२० मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाली होती.

(२) हे खरे नाही.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत शेलार, खोनी, मिठपाडा व परिसरातील उद्योगांच्या केलेल्या पाहणीदरम्यान दोषी

आढळलेल्या २ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, २ उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश व ४ उद्योगांना प्रस्तावित आदेश जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ चे कलम ३३ (अ) व हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ चे कलम ३१ (अ) अन्वये बजावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विनापरवाना ड्रायव्हिंग स्कूल सुरु करण्यात आल्याबाबत

(४) * १९७३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी परिवहन कार्यालयांकडून परवानगी न घेताच ड्रायव्हिंग स्कूल सुरु करण्यात आले असून शिकाऊ चालकांना वाहन परवाना देताना आवश्यक असणारे नमुना क्र. ५ व ५ अ हे अर्ज न भरताच वाहन परवाने दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन आयुक्तालयाकडून सारथी या प्रणालीवर नमुना क्र. ५ व ५ अ हा ऑनलाइन पद्धतीने भरण्याचे आदेश दिले असताना सुद्धा त्याची अंमलबजावणी न होता अर्ज न भरताच वाहन परवाने दिले जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणांमध्ये संबंधित अधिकारी व मोटार ड्रायव्हिंग स्कूलच्या संगनमताने हा प्रकार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब : (१) अशा आशयाची बातमी दि.०६.०१.२०२० रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली आहे. मात्र राज्यातील प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात विनापरवाना ड्रायव्हिंग स्कूलची उभारणी झाल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त माहितीनुसार परिवहन संवर्गातील वाहने चालविण्यासाठी शिकाऊ अनुज्ञप्ती प्राप्त केलेल्या उमेदवारांना पक्की अनुज्ञप्ती जारी करताना नमुना क्र. ५ व जड मोटार वाहन अनुज्ञप्ती जारी/नुतणीकरण करताना नमुना क्र.५ अ मधील प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय सदर अनुज्ञप्ती जारी करण्यात येत नाहीत.

(२) राज्यातील सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक कार्यालयांना सारथी प्रणालीमध्ये नमुना ५ व ५ अ ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाव्दारा दि.११/१२/२०१९ व दि.०३.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत. उमेदवारांना परिवहन संवर्गातील वाहन चालविण्यासाठी पक्की अनुज्ञप्ती जारी करताना नमुना क्र.५ व जड मोटार वाहन अनुज्ञप्ती नुतनीकरण करताना नमुना ५ अ मधील प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय, सदर अनुज्ञप्ती जारी करण्यात येत नाहीत. जानेवारी २०२० व त्यापूर्वी जारी केलेल्या शिकाऊ अनुज्ञप्ती प्रकरणात ऑनलाईन पध्दतीने नमुना क्र.५ ऐवजी ऑफलाईन पध्दतीने नमुना क्र.५ स्विकारण्यात आले आहे.

(३) व (४) नमुना ५ व ५ अ सादर केल्यानंतरच जड मालवाहू वाहन व जड प्रवासी वाहनांसाठी अनुज्ञप्ती जारी / नुतणीकरण करण्याची कार्यवाही केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मामुलवाडी ग्रामपंचायत (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) अंतर्गत असलेल्या मौ.धाडी गावाचा हिंगणे गव्हाण १३ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेत समावेश करण्याबाबत

(५) * ३०५५ श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धाडी, गट ग्रामपंचायत मामुलवाडी (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) या गावामध्ये दरवर्षी तीव्र पाणीटंचाई निर्माण होत असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गट ग्रामपंचायत मामुलवाडी अंतर्गत मौ.धाडी गावाचा हिंगणे गव्हाण व १३ गाव पाणीपुरवठा योजनेत समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बुलढाणा यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार ग्रामपंचायत मामुलवाडी अंतर्गत मौ.धाडी गावाचा हिंगणे गव्हाण व १३ गाव पाणीपुरवठा योजनेत समावेश करुन पाणी टंचाई दुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) हे खरे नाही.

(२) सदर बाबतीत निवेदन कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बुलडाणा यांना प्राप्त झाले आहे.

(३) हिंगणे गव्हाण व १३ गांवे (ता.नांदुरा, जि.बुलडाणा) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमध्ये समाविष्ट मामुलवाडी गावाच्या पाण्याच्या टाकीद्वारे मौ.धाडी गावास पाणी पुरवठा करणे शक्य आहे. त्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात बांधकाम झालेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या इमारती विनावापर पडून असल्याबाबत

(६) * ६८८९ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बांधकाम झालेल्या शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थांच्या (आयटीआय) १७ इमारती गत १६ वर्षापासून विनावापर पडून असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या इमारतींचा ताबा कौशल्य विकास विभागाने न घेतल्यामुळे बांधकामाचा ६४ कोटी रुपयांचा खर्च वाया गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाड्याच्या इमारतीत ही आयआयटी केंद्रे सुरु असल्याने वर्षाला २५ लाख रुपयांची रक्कम भाड्यापोठी अदा केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन सदर इमारतींचे तातडीने हस्तांतरण करुन तेथे आयआयटी केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नवाब मलिक : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांअंतर्गत एकूण १७ शासकीय संस्थांपैकी १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ०३ वसतीगृह व २ शासकीय तांत्रिक विद्यालये यांच्या बांधकामांसाठी एकूण रुपये ८०७३.४० लक्ष रक्कम खर्च झालेली आहे. एकूण १७ संस्थांच्या इमारतीपैकी एकूण १२ संस्थांच्या इमारतींचे हस्तांतरण झालेले आहे. उर्वरीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था मांडवी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलुंड, औद्योगिक प्रशिक्षण संस्था वाणगाव वसतीगृह, औद्योगिक प्रशिक्षण संस्था पेण वसतीगृह व शासकीय तंत्र विद्यालय, जव्हार या पाच संस्थांच्या इमारतीमधील काही कामे अपूर्ण असल्याने या विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या नाहीत. सदर अपूर्ण कामे पूर्ण करावयाची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) आवश्यक कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण झाल्यानंतर नियमाप्रमाणे पूर्णत्व प्रमाणपत्र मिळाल्यानंतर इमारतीचा ताबा घेण्यात येईल.

परभणी आगारातील एस.टी. महामंडळाच्या बसेसची दुरवस्था झाल्याबाबत

(७) * १९६९ डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी आगारातील एस.टी. महामंडळाच्या बसेसची दुरवस्था झाली असून आगारात असलेल्या ६६ बसेसपैकी निम्म्यापेक्षा जास्त बसेस मोडकळीस आलेल्या व नादुरुस्त असतांनाही सदर बसेसमधून जिल्ह्यातील हजारो प्रवासी आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसेसमध्ये प्रथमोपचार पेटी व अग्निशमन यंत्रणा नसून याकडे विभागीय नियंत्रकांकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी आगारातील बसेसची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी व मोडकळीस आलेल्या अवस्थेतील बसेस बंद करुन त्याऐवजी नवीन बसेस उपलब्ध करुन देण्यात याव्यात अशी मागणी स्थानिक नागरीक व प्रवाशी यांच्याकडून वारंवार संबंधित अधिकाऱ्याकडे करण्यात येऊनही अद्याप कोणतीही उपयायोजना करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) परभणी आगारामार्फत सरासरी ६२ नियते चालविली जातात व त्याकरिता आगारामध्ये ६६ वाहने उपलब्ध असून, आगार पातळीवर आवश्यक ती देखभाल व दुरुस्ती करुन सुस्थितीत बसेस मार्गस्थ करण्यात येतात. तसेच, बसेसमध्ये प्रथमोपचार साहित्य व अग्निशमन उपकरण उपलब्ध आहेत.

परभणी आगारास मागील दोन वर्षात १८ नवीन व ६ पुन:र्बांधणी केलेल्या बसेसचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच ४ जुन्या गाडया मोडीत काढण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खोपोली (ता.खालापूर, जि.रायगड) पाताळगंगा नदी प्रदुषणात वाढ होत असल्याबाबत

(८) * २४२२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (ता.खालापूर, जि.रायगड) नगरपरिषदेच्या हद्दीतून दररोज लाखो लिटर सांडपाणी थेट पाताळगंगा नदीत सोडत असल्यामुळे पाणी प्रदुषणात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खोपोली नगरपरिषद क्षेत्र व खालापूर तालुक्यातील शेकडो गावांच्या पाणी पुरवठा योजना पाताळगंगा नदीवर अवलंबून आहेत, तसेच सदर नगरपरिषदेची भुयारी गटार योजना प्रलंबित असून खोपोली शहरातून लाखो लिटर सांडपाणी नदीत सोडल्यामुळे पाणी पुरवठा योजनेवर याचा विपरीत परिणाम होत असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पाताळगंगा नदीचे वाढते प्रदुषण रोखण्याबाबत तसेच खोपोली नगरपरिषदेची भुयारी गटार योजना राबविण्यासाठी कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे : (१) खोपोली नगरपरिषद हददीतील सांडपाणी पाताळगंगा नदीत जाऊन मिसळते हे खरे आहे. तथापि, मंडळातर्फे नदीच्या पाण्याची गुणवत्ता नियमितपणे तपासली जाते. त्यानुसार प्रदूषणात वाढ झाली आहे हे खरे नाही.

(२) व (३) जलसंधारण उप विभाग कर्जत यांच्या अहवालानुसार खालापुर तालुक्यातील पाताळगंगा नदीवर नदी पाणी पुरवठा योजनेअंतर्गत जलशुध्दीकरण सयंत्रणा बसवुन गावांना शुध्द पाणी पुरवठा केला जातो. तालुका आरोग्य अधिकारी, खालापूर यांच्या दि.२८.०२.२०२० रोजीच्या अहवालानूसार कोणत्याही प्रकारची साथ उदभवली नाही.

सद्य:स्थितीत खोपोली नगरपरिषदेकडून भूयारी गटार योजनेचे सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडे तांत्रिक मंजुरीसाठी प्रलंबित आहे. त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात पोषण आहार योजनेत होत असलेला गैरव्यवहार

(९) * ६९४२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने सन १९९५ मध्ये राज्यातील ३६ जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहार योजनेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे शासनाच्या आकडेवारीमधून माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात प्रत्येक जिल्ह्यात तेच पुरवठादार असून, त्यांनी कंत्राटासाठीच्या निविदेत नमूद केलेले दर हे खुल्या बाजारातील अन्नधान्यांच्या दरापेक्षा अधिक असल्याचे माहितीच्या अधिकारात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास दरवर्षी या योजनेत सुमारे १०० कोटी रुपये खाजगी कंत्राटदाराला जादा दिल्याचे निदर्शनास आल्याच्या रितसर तक्रारी शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तसेच शिक्षण संचालक, पुणे यांचेकडे वारंवार करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने ही योजना आता शासकीय यंत्रणेमार्फत राबवावी अशी तक्रारदारांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय
(६) नसल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार चौकशी करण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१) हे खरे नाही.

तथापि, अशा प्रकारची बातमी माहे जानेवारी मध्ये वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) ई-निविदेव्दारे धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी पुरवठेदार निश्चित करताना निविदेतील न्युनतम दराप्रमाणे पाककृतीनुसार येणारा खर्च हा शासनाने प्रतिदिन प्रति विद्यार्थी धान्यादी मालाकरिता निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी असल्याची खात्री करण्यात येते. पुरवठेदारास धान्यादी मालाची वाहतूक शाळा स्तरावर करणे बंधनकारक असल्याने वाहतूकीच्या खर्चाचा समावेश दरामध्ये असतो.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

दौंड, (जि.पुणे) येथे उप प्रादेशिक मोटर परिवहन कार्यालय (RTO) सुरु करणेबाबत

(१०) * ६८१२ श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) येथे उप प्रादेशिक मोटर परिवहन कार्यालय (RTO) सुरु करणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी कार्यालय सुरु होईपर्यंत तिथे घेण्यात येणारे अनुज्ञप्ती चाचणी, शिकाऊ अनुज्ञप्ती व वाहन नोंदणीचे शिबीर नियमित घेण्यात यावे अशी मागणी देखील करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कार्यालय सुरु करण्याबाबत वा शिबीर नियमित सुरु ठेवण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब : (१), (२) व (३) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती यांचेमार्फत प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चौथ्या बुधवारी दौंड जि.पुणे येथे वाहनधारकांच्या अनुज्ञप्ती चाचणी, शिकाऊ अनुज्ञप्ती व वाहन नोंदणीच्या कामासाठी शिबीराचे आयोजन करण्यात येते.

शासन निर्णय दि.१८.०६.२०१८ अन्वये मोटार वाहन विभागांतर्गत नवीन कार्यालय निर्मितीसंदर्भात निकष विहित केले आहेत. त्यानुसार एखाद्या जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन जिल्हा निर्माण झाला असेल तर या नवीन जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये नवीन परिवहन कार्यालयाची स्थापना करावी. इतर कोणत्याही परिस्थितीत नवीन कार्यालयांची स्थापना करण्यात येऊ नये आणि ज्या जिल्ह्यांची लांबी जास्त आहे अशा जिल्ह्यांमध्ये जनतेच्या सोईसाठी नवीन परिवहन कार्यालय उघडण्याऐवजी वाहन चालक चाचणी केंद्र तसेच वाहन तपासणी व परिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत असे निकष आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

"लंडन आयच्या" धर्तीवर मुंबईतील समुद्रात "मुंबई आय" उभारण्याबाबत

(११) * ६५३३ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लंडन येथील थेम्स नदीवर उभारण्यात आलेल्या "लंडन आय" सारखाच अरबी समुद्रात "मुंबई आय" उभारण्याच्या प्रस्तावास दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भातील अहवाल तयार करण्यात आला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) अंशत: खरे आहे. वांद्रे रेक्लमेशन, मुंबई येथे "मुंबई आय" ची उभारणी करण्याच्या प्रस्तावास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तत्वत: मंजूरी दिली आहे.

(२) व (३) सदर प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तयार करण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात बाजारपेठेचे आकलन करण्यासाठी प्राधिकरणामार्फत स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव दिनांक १६.०१.२०२० रोजी मागविण्यात आले आहेत.

डोंबिवलीतील (जि.ठाणे) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथे प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सुसज्ज कार्यालय स्थापन करणेबाबत

(१२) * १४७० श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली एमआयडीसीमध्ये (जि.ठाणे) प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सुसज्ज कार्यालय स्थापन करणेबाबत दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवली शहर व परिसरातील प्रदुषण नियंत्रीत करण्याकरिता आवश्यक असलेले प्रदुषण नियंत्रण मंडळाचे कार्यालय स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे : (१) हे खरे आहे.

(२) मंडळातर्फे, कल्याण येथे कार्यरत असलेले कार्यालय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या डोंबिवली येथील कार्यालयामध्ये स्थलांतरित करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उरण (जि.रायगड) येथील मोहपाडा व रसायनी परिसरातील पाणीटंचाईबाबत

(१३) * ७२३७ श्री.महेश बालदी (उरण) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील मोहपाडा व रसायनी या परिसरात जवळपास २५ हजार लोकसंख्या असताना या भागात शासनामार्फत पाणीपुरवठा करण्यासंदर्भात कोणतीच योजना अद्यापपर्यंत राबविण्यात न आल्याने येथे पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात देवळोली व जांभिवली ही दोन धरणे असतानाही या धरणातील पाण्याचा पुरवठा या परिसरातील नागरिकांना शेतीच्या कामासाठी तसेच पिण्यासाठी करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू धरणातील पाणी या परिसरातील नागरिकांना पिण्यासाठी तसेच शेतीच्या वापरासाठी उपलब्ध करून देण्याबाबत अथवा एखादी पाणी पुरवठा योजना या ठिकाणी राबवून येथील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सोडविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच या ठिकाणी पाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत अथवा उक्त दोन धरणातील पाणी स्थानिक नागरिकांना वापरासाठी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व त्याचे स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खर आहे.

(४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

मोहोपाडा हे गाव खालापूर तालुक्यातील आहे. सदर हद्दीत मोहोपाडा, रिस, आंबिवली त. तुंगारतन, पोसरी ही ४ गावे येत असून या गावांना

प्रत्येकी दोन इंच व्यासाच्या नळ जोडणीद्वारे एम.आय.डी.सी. मार्फत पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

देवळोली व जांभिवली ही दोनही धरणे सिंचनासाठी राखीव असून सिंचनासाठी मागणीनुसार पाणी सोडण्यात येते. पिण्याच्या पाण्यासाठी जलसंपदा विभागाकडे मागणी करण्यात आलेली नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत पिण्याच्या पाण्याची मागणी केल्यास पाणी उपलब्धतेनुसार पाणी आरक्षणाचा सकारात्मक विचार करण्यात येईल.

सावले गावासाठीच्या योजनेच्या उद्भवास ग्रामस्थांचा विरोध असल्याने सदर उद्भव बदलून एम.आय.डी.सी. चा उद्भव प्रस्तावित करुन योजना सुधारीत केली असून मंजूरी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. उर्वरीत गावांकरीता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या असून पाणी पुरवठा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खाजगी शिकवण्या घेणाऱ्या संस्थांना कनिष्ठ महाविद्यालये सुरु करण्याची देण्यात आलेली परवानगी

(१४) * ६१०५ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण धोरणावर बोट ठेवून, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्य शाळा (आस्थापना आणि नियमन) कायदा करण्यात आला, त्यानुसार स्वयंअर्थसहाय्याने नव्या शाळेसह जूनी शाळाही अद्ययावत करण्याची तरतूद असतांना या कायद्याच्या विरोधात जावून सर्रासपणे खाजगी शिकवण्या चालविणाऱ्या संस्थाना कनिष्ठ महाविद्यालये चालविण्याची परवानगी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी राज्यातील शिक्षण क्षेत्राचा बाजार झाला असल्याचे ताशेरे मा.उच्च न्यायालयाने शासनावर ओढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१), (२) व (३) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ नुसार नवीन शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास परवानगी देण्याची तसेच विद्यमान शाळेची दर्जावाढ करण्याची तरतूद आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार जमिन व इतर विहीत अटी व निकषांची पुर्तता करणाऱ्या कोणत्याही संस्थेस शासनाची परवानगी घेऊन शाळा सुरू करता येते. मात्र, सदर अधिनियमाव्दारे त्रुटी पुर्तता करण्याच्या अधीन राहून परवानगी दिलेल्या काही कनिष्ठ महाविद्यालयांच्या परवानगी आदेशाविरूध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.२३३१/२०१९ दाखल असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापुर महानगरपालीकेने शाळेतील शालेय पोषण आहाराचे महिला बचत गटांचे ठेके रद्द केल्याबाबत

(१५) * ३८८२ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापुर महानगरपालिकेच्या केंद्रीय स्वयंपाकगृह पध्दतीमुळे महानगरपालिका शाळेतील शालेय पोषण आहाराचे महिला बचत गटांचे ठेके रदद करुन नव्याने प्रसिध्द केल्यामुळे महिलांनी उक्त प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाच्या विरोधात धरणे आंदोलन केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने काढलेल्या निविदेमध्ये जाचक अटी व नियम घालून सर्वसामान्य महिला बचत गटांना काम मिळू नये याकरीता कार्यवाही करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने केंद्रीय स्वयंपाकगृह पध्दतीसाठी राबविलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये त्रुटी असुन चुकीच्या पध्दतीने काम ठेकेदारास देण्यात आले आहे, हे ही खरे आाहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आह,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वंडली (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील पाणी पुरवठा योजनेकरीता निधी उपलब्ध करणेबाबत

(१६) * ७३४२ डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वंडली (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील दोन हजार वस्ती असलेल्या गावांमध्ये राष्ट्रीय ग्रामिण पेयजल योजनेमध्ये पाणी पुरवठयाकरीता नविन टाकीचे बांधकाम व पाईपलाईन इत्यादी कामे मंजुर केली असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाव पाणी टंचाई मुक्त होण्यासाठी मंजुर पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावास मंजूरी मिळाली असली तरी निधी उपलब्ध करून दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर मंजूर योजनेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) व (२) हे खरे नाही.
(३) सदर प्रस्ताव दरडोई खर्च जादा असल्याने प्रशासकीय मान्यतेसाठी प्राप्त झालेला होता. मात्र आता सर्व योजना केंद्र शासनाच्या जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करावयाच्या आहेत. त्यानुसार बदल करुन प्रस्ताव त्वरित शासनास मंजुरीस्तव सादर करण्याच्या सूचना दि.१५.०२.२०२० रोजी देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथील स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अभिनव भारत मंदिर वास्तूस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(१७) * ३५७४ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील स्वातंत्र्यपूर्व काळातील क्रांतिकारकांचे केंद्र असणाऱ्या अभिनव भारत मंदिर या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या वास्तूस पाच कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याची विनंती मा.पर्यटन मंत्री यांना दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे : (१) होय, हे खरे आहे.
(२) या संदर्भात जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून अहवाल /अभिप्राय मागविण्यात आलेत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे सुरेगांव, घुटेवाडी, चिखली, कोरेगांव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) या गावांसाठी नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वीत होऊनही पाणी पुरवठा होत नसल्याबाबत

(१८) * ७४१३ श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुरेगांव, घुटेवाडी, चिखली, कोरेगांव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) गावांसाठी विसापूर धरणावरून नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वीत केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत होऊनही अद्याप नागरिकांना पाणी पुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजना अद्यापही सुरु न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच ही योजना केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) अशंत: खरे आहे,

योजना सन २००५ मध्ये कार्यान्वित केली आहे.

(२) अशंत: खरे आहे.

योजनेतून सुरेगाव गावास पाणी पुरवठा होत आहे.

(३) सुरेगाव व ३ गावे अशी एकत्र पाणी पुरवठा योजना राबविण्यात आली आहे. तथापि, सन २००५ मध्ये योजना कार्यान्वित केल्यापासून सुरेगाव वगळता इतर तीनही गावांत ३ स्टेज पंपीगमुळे या योजनेतून नियमित पाणी पुरवठा करता आला नाही.

आता घुटेवाडीसाठी स्वतंत्र स्त्रोत घेऊन ऑक्टोबर, २०१९ पासून नियमित पाणी पुरवठा सुरु आहे. तसेच, चिखली या गावासाठी घोसपूरी व १६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे. कोरेगाव गावासाठी स्वतंत्र योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील धनगरवाड्यांतील पाणी टंचाई दुर करण्याबाबत

(१९) * १२२७ श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ३३ गावांमधील ७५ धनगरवाडया पिण्याच्या पाण्याच्या सुविधेपासून वंचित असून पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धनगरवाड्यांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) हे अंशत: खरे आहे.

खेड तालुक्यात ६८ गावांमध्ये ७० धनगरवाड्या आहेत. ३२ धनगरवाड्यांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही.

(२) खेड तालुक्यातील ३८ धनगरवाड्यांना विहीर, हातपंप, नळपाणी पुरवठा योजना इत्यादी माध्यमातून पुरेसे पाणी उपलब्ध होत आहे. इतर ठिकाणी गरजेनुसार व स्थानिक परिस्थितीनुसार नवीन विहीरी, अस्तित्वातील नळपाणी पुरवठा योजना दुरुस्त / पुनरुज्जीवीत करणे अशा विविध प्रकारच्या उपाययोजना प्रस्तावित करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांमध्ये स्वच्छतागृहाअभावी मुलींची होणारी गैरसोय

(२०) * ६११६ श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सुमारे ६६७५० शाळांपैकी ६५१०३ शाळांतील मुलींच्या स्वच्छता गृहाचे ऑडीट करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अनेक शाळांमध्ये मुलींच्या स्वच्छतागृहांची देखभाल व दुरुस्तीअभावी स्वच्छतागृहे बंद असल्यामुळे मुलींची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मुलींची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने ऑडीट करून मुलींच्या शाळांतील स्वच्छता गृहांची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, कार्यवाहींचे स्वरूप काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) समग्र शिक्षा अंतर्गत संयुक्त शाळा अनुदान (Composite School Grant) या निधीतून १० टक्के निधी स्वच्छ ॲक्शन प्लॅन (SAP) अंतर्गत शाळा स्वच्छता उपक्रमावर खर्च करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील भटक्या व विमुक्त जातीच्या मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याबाबत

(२१) * २८२७ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील भटक्या/विमुक्त जातीच्या मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा स्तरावर पूर्व प्राथमिक ते पदुव्यतर इंग्रजी माध्यमातुन शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत बल्लारपूरच्या लोकप्रतिनिधींनी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर विषयाच्या अनुषंगाने संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. तसेच शालेय शिक्षण विभाग आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास सदर निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये निकृष्ट दर्जाचा पोषण आहार देण्यात येत असल्याबाबत

(२२) * ५०५५ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे १५०० शाळांमध्ये पुरवठा करण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराचे धान्य हे निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शाळेच्या शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करुनही त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१) हे खरे नाही.

(२) व (३) ठाणे जिल्ह्यातील पंचायत समिती कल्याण अंतर्गत जिल्हा परिषद शाळा उतने येथे पुरवठा केलेला धान्यादी मालापैकी हरभरा निकृष्ट दर्जाचा असल्याचे निदर्शनास आले होते. सदर हरभरा पुरवठादाराने करारनाम्यातील तरतूदीनुसार बदलून दिलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकान धारकांची डाळ गोदामात पडून असल्याबाबत

(२३) * ६३९५ श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांना देण्यात येणारी सुमारे ६९६ टन डाळ शासकीय गोदामात शिल्लक असल्याचे दिनांक १७ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त डाळ निष्कृष्ट दर्जाची असून शिधापत्रिका धारक घेत नसल्याने खुल्या बाजारातील किंमतीमध्ये सदर डाळीची विक्री करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने स्वस्त धान्य दुकानात दर्जेदार व सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरामध्ये डाळ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ : (१) हे खरे नाही.

सोलापूर (शहर) मधील शासकीय धान्य गोदामामध्ये १९८ मे.टन डाळ शिल्लक आहे.

(२) व (३) शिधापत्रिकाधारकांस निकृष्ट दर्जाची डाळ वितरीत होणार नाही यादृष्टीने खराब डाळ रास्तभाव धान्य दुकानदारांकडे प्राप्त झाल्यास सदर डाळ बदलून घेण्याबाबतची दक्षता घेण्याबाबतच्या सूचना रास्तभाव धान्य दुकानदारांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार रास्तभाव धान्य दुकानारांकडून डाळींचे वाटप करण्यात येत आहे. सदर डाळ निकृष्ट असल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

उर्वरित शिल्लक डाळीचे वाटप लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत कफ सिरपची बेकायदा विक्री होत असल्याबाबत

(२४) * ७००४ कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत कफ सिरपचा नशेसाठी अधिक वापर होत असल्याने त्याच्या विक्रीत वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ मध्ये मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने ७ हजार कफ सिरपच्या बाटल्या हस्तगत करून अकरा जणांना अटक केली असताना अन्न व औषध प्रशासनाकडून केवळ तीनच विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली तसेच जप्त केलेला कफ सिरपचा साठाही नगण्य असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कफ सिरपच्या बेकायदा विक्रीस प्रतिबंध करणे तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सन २०१९ मध्ये मुंबई पोलीसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून ७५७७ कफ सिरपच्या बाटल्या हस्तगत करून १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तर, अन्न व औषध प्रशासनाव्दारे सन २०१९ मध्ये कफ सिरपच्या बेकायदेशीर / अवैध विक्री प्रकरणी १५ प्रकरणात पोलीसांकडे प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आलेला आहे तर ०२ व्यक्तींना पोलीसांनी अटक केलेली आहे.

(३) औषध विक्री पेढ्यांकडून कफ सिरपची विक्री डॉक्टरांच्या चिठ्ठीनुसार व औषधे सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदीनुसार होते किंवा नाही याबाबतची नियमितपणे पडताळणी अन्न व औषध प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून करण्यात येते. तपासणीवेळी आढळुन आलेल्या उल्लंघनाच्या अनुषंगाने पेढीविरूध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मु.वाळुसुरे, पो.कोंजर (ता.महाड, जि.रायगड) गावातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

(२५) * ६१३२ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.वाळसुरे, पो.कोंजर (ता.महाड, जि.रायगड) या ३५० लोकसंख्या असलेल्या गावात पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची व बोअरवेलची पाणी पातळी खालावल्यामुळे ग्रामस्थांना पिण्याकरिता पाणी मिळत नसल्याने त्यांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन सदरहू गावाची पिण्याच्या पाण्याची समस्या तातडीने सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) अंशतः खरे आहे.

वाळसुरे गावठान, बौध्दवाडी व दत्तवाडी याकरिता नियमित पाणी पुरवठा योजना कार्यान्वित आहे. उंच डोंगरावरील वाळसुरे नगरभुवन या वाडीकरिता पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होते.

(२) संभाव्य टंचाईचा महिना एप्रिल, २०२० विचारात घेऊन सन २०१९-२० च्या कृती आराखड्यामध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे या उपाययोजनेअंतर्गत वाळसुरे व नगरभुवन या वाड्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चितलवाडी (ता.तेल्हारा, जि.अकोला) गावातील दूषित पाण्यामुळे किडनीच्या आजारात वाढ होत असल्याबाबत

(२६) * ७४०१ श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या चितलवाडी (ता.तेल्हारा, जि.अकोला) गावात मागील तीन-चार वर्षापासून अनेक नागरिक किडनीच्या विकाराने त्रस्त असून काही जणांचा मृत्यु होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील पिण्याचे पाणी अशुद्ध असल्यामुळे सदर आजाराची लागण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार चितलवाडी व परिसरातील गावांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१६ते २०१९ या कालावधीत चितलवाडी (ता.तेल्हारा, जि.अकोला) गावात विविध आजारांनी एकूण ५७ नागरिकांचा मृत्यू झाला असून त्यापैकी ६ नागरिकांचा किडनीच्या विकाराने मृत्यू झाला आहे. दिनांक ५ जानेवारी, २०२० च्या आरोग्य तपासणी अहवालानुसार एकूण १२६ रूग्ण विविध आजारांनी बाधित असून त्यापैकी ०७ रूग्ण किडनीच्या आजाराने संशयित आहेत.

(२) हे खरे नाही.

चितलवाडी येथील पिण्याच्या पाण्याची अनुजैविक व रासायनिक तपासणी केली असून स्त्रोतांचे पाणी पिण्यास योग्य असल्याचे आढळून आले आहे.

(३) चितलवाडी गावातील पाण्यामध्ये नायट्रेटचे प्रमाण काही प्रमाणात जास्त असल्यामुळे जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत चितलवाडी येथे जलशुध्दीकरण सयंत्र (आरओ. मशीन) बसवून शुध्द पाण्याचा पुरवठा सुरू करण्यात आलेला आहे.

तसेच वान प्रकल्पावरून प्रस्तावित १५० गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमध्ये चितलवाडी व त्या परिसरातील गावे समाविष्ट करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हा परिषदेतील अनेक शाळांना गणवेश निधी मिळण्याबाबत

(२७) * ६७५८ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेतील (जि.चंद्रपूर) अनेक शाळांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात गणवेश निधी प्राप्त झाला नसल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने राज्य प्रकल्प संचालक, प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडे दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणवेश निधी वितरीत न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील गणवेश निधी प्राप्त न झालेल्या शाळांना तात्काळ गणवेश निधी अदा करण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१) हे खरे आहे.

(२) व (३) मोफत गणवेश योजनेसाठी चंद्रपूर जिल्ह्यातील पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ देण्यासाठी जिल्हा स्तरावर असलेला मागील वर्षातील अखर्चित निधी व शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीस वर्ग करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई विभागांतर्गत असलेल्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये झालेली अनियमितता

(२८) * ६२२८ श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) विभागांतर्गत येणा-या केज, धारुर, माजलगाव, परळी, वडवणी या पाच तालुक्यासाठी सन २००४ मध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालय सुरु झाल्यानंतर सध्या आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी तेथील दलालांना हाताशी धरुन वाहन नोंदणी पुस्तिकेवर रोड टॅक्स, विमा व शासनाचे इतर कर आकारणीची नोंद व वाहन नोंदणी करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या नोंदी केल्या असता त्या नोंदी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या दस्ताऐवजातच नसल्याचे निदर्शनास आले असून व्ही.आय.पी क्रमांक, वाहन नोंदणी, विलंब शुल्क या प्रकारच्या बनावट पावत्या तयार करुन या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करत शासनाचे कोटयवधी रुपयांचे नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत दोषी आढळलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) महालेखाकार यांचे अहवालानूसार सन २००४-२००८ या कालावधीत वाहनकराची रक्कम वसुल करुन रोकडवहीत खाडाखोड करणे, कोषागारात कमी रक्कम जमा करणे अशा प्रकारे शासकीय रकमांचा अपहार झाला असल्याचे निदर्शनास आले होते. याबाबत अंबाजोगाई पोलीस ठाणे येथे दि.०६.०८.२००८ रोजी गुन्हा क्र.१८९/०८ नोंद करण्यात आला व संबंधित लिपीकाविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करुन शासकीय अपहार रकमेपैकी रु.४,११,०००/- इतक्या रकमेची वसूली करण्यात आली.

विभागीय चौकशी सुरु असताना संबंधित अपचारी कर्मचारी यांचे दि.२४.०३.२०१० रोजी निधन झाले असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,१९७९ च्या नियम १३(४) अन्वये त्यांचेविरुद्धची विभागीय चौकशी संपुष्टात आली आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाने घेतलेल्या शिक्षक पात्रता परिक्षेतील (टीईटी) प्रश्नपत्रिकेत चुकीचे प्रश्न आढळल्याबाबत

(२९) * ५५९१ श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनामार्फत दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परिक्षेस (टीईटी) राज्यभरातून ३ लाख ४३ हजार ३६४ परिक्षार्थी बसले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेच्यावतीने पेपर १ व पेपर २ या विषयाच्या प्रश्नपत्रिका तयार करण्यात आल्या होत्या हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही पेपरमध्ये मोठया प्रमाणात विशेषत: पेपर १ मध्ये १०० पेक्षा अधिक चुका असल्याचे आढळून आल्याने परिक्षार्थ्यांनी या बाबत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे तक्रारी केल्या व जे प्रश्न चुकीचे होते त्यासाठी गुण देण्यात यावेत अशी मागणी दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून व त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१) ३,४३,२८३ परिक्षार्थी बसले होते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शिधावाटप कार्यालयांना आयएसओ मानांकन मिळवून देण्याबाबत

(३०) * ४७९६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिधावाटप कार्यालयांना आयएसओ मानांकन मिळवून देण्याबाबत शासन प्रयत्नशील असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयएसओ मानांकनामुळे नागरिकांना घरबसल्या शिधावाटप पत्रिकेवरील नाव रद्द करणे, नाव जोडणे व नावात दुरुस्ती करणे इत्यादी सर्व सुविधा ऑनलाईन मिळणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे शिधावाटप केंद्रातील सुविधांमध्ये पारदर्शकता येणार असल्याने राज्यात शिधावाटप कार्यालयांना कधीपर्यंत हे मानांकन मिळणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ : (१) अंशत: खरे आहे.
(२) खरे आहे.

(३) तांत्रिक बाबींची पूर्तता करुन लवकरच मानांकनाची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शालेय स्तरावर स्टूडंट पोलिस कॅडेट प्रोग्रॅम राबविण्याबाबत

(३१) * ३४८६ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये विविध मुल्य रुजवीत, त्यांच्या मनात पोलीसांविषयी असणारी भिती जावी यासाठी 'स्टुटंड पोलीस कॅडेट प्रोग्राम' (एसपीसी) हा उपक्रम राज्यातील ३५४ शासकीय शाळांमध्ये राबविण्यात येणार असून गुन्हेगारीचा तसेच दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी लहानपणापासून मुलांना शालेय शिक्षण स्तरावर पोलीसी शिक्षण देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय शिक्षणासोबतच इयत्ता ८ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सदर उपक्रम राबविण्यासाठी १ कोटी ७७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपक्रमात पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरातील २० शाळांचा समावेश करण्यात आला असून त्यास प्रत्येक शाळांसाठी रुपये ५० हजारांचा निधी देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानूसार आतापर्यंत किती शासकीय शाळांमध्ये सदरचा निधी वाटप करण्यात आला आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अनिल देशमुख : (१) हे खरे आहे. स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्राम हा केंद्र पुरस्कृत उपक्रम असून तो गृह विभागामार्फत शालेय शिक्षण विभागाच्या समन्वयाने राबविण्यात येत आहे.

(२) सदर उपक्रम राबविण्याकरीता प्रथम टप्प्यात दि.२२.११.२०१९ च्या शासन निर्णयान्वये इयत्ता ८वी आणि ९ वी चे वर्ग असलेल्या राज्यातील ३५४ सरकारी शाळांकरीता रु.१ कोटी ७७ लाख इतका निधी उपलब्ध करुन देणेबाबत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर निधी वित्त विभागाच्या सहमतीने संबंधित पोलीस घटकांना/सरकारी शाळांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, दि.१४.०२.२०२० च्या शासन निर्णयान्वये नव्याने एकूण ६५० सरकारी शाळांची निवड करण्यात आली असून त्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

(४) उपरोक्त उपप्रश्न -२ वरील उत्तरात नमूद केल्याप्रमाणे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल, उरण (जि.रायगड) तालुक्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिन्यांची दुरुस्ती करण्याबाबत

(३२) * ३५०५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल व उरण (जि.रायगड) तालुक्याला पाणीपुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिन्या बऱ्याच कालावधीपासून अनेक ठिकाणी फुटलेल्या असल्यामुळे पाणी गळती होवून दररोज लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागातील फुटलेल्या जलवाहिन्यांच्या पहाणीकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्थापन केलेल्या भरारी पथकाने पहाणी करुन पनवेल व उरण तालुक्यातील कोणत्या भागात किती जलवाहिन्या फुटल्या आहेत याची नोंद घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फुटलेल्या जलवाहिन्यांची तातडीने दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील न्हावा-शेवा पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल व दुरुस्तीकरीता नियमित नेमलेल्या कामगारांकडून देखभाल व दुरुस्तीचे काम करण्यात येते. भरारी पथक स्थापन केलेले नाही.
(३) फुटलेल्या जलवाहिनीची तातडीने नियमितपणे दुरुस्ती करण्यात येत आहे. तसेच सदर योजनेच्या क्षमतेत वाढ करणे व जलवाहिन्या पूर्णपणे बदलण्याच्या दृष्टीने रु.४०८.७८ कोटी रकमेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. या अंतर्गत निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणीसाठी नेमण्यात आलेल्या दक्षता पथकांबाबत

(३३) * ३८९८ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संपूर्ण राज्यासाठी ७ स्वतंत्र दक्षता पथकाची स्थापना करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत समिती, कटक मंडळ, नागरी भागातील व शाळांमधील केंद्रीय स्वयंपाक गृहे, धान्य पुरवठादाराचे गोदाम व पुरवठा करणारी वाहने यांना भेटी देऊन योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की की नाही हे पाहण्याचे काम दक्षता पथकाचे आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दक्षता पथकाने राज्यात कोणकोणत्या ठिकाणी दौरे केले आहेत व त्यात काय आढळून आले त्यानुसार दोषी पुरवठादार व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१) हे खरे आहे.

प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या दि. १३/०८/२०१९ च्या आदेशान्वये प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावर सात दक्षता पथके गठित करण्यात आली आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) दक्षता पथकाने उस्मानाबाद, बीड, लातूर, हिंगोली, पुणे व सोलापूर जिल्ह्यातील शाळांना भेटी दिल्या आहेत. तसेच, केंद्रीय स्वयंपाकगृह अंमलबजावणीचा आढावा घेण्याकरिता पुणे, सोलापूर, औरंगाबाद महानगरपालिका आणि करमाळा व बारामती नगरपालिकेतील केंद्रीय स्वयंपाकगृह व शाळांना भेटी दिल्या आहेत. महानगरपालिका व नगरपालिका भेटीवेळी केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीबाबत आढळून आलेल्या वस्तुस्थितीच्या अनुषंगाने केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने प्राथमिक शिक्षण संचालनालयाने शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीबाबतच्या देयकांची अदायगीबाबत सुधारित निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील गरीब कुटूंबांना स्वस्त धान्य दुकानातुन प्रतिमाह ३५ किलो धान्य उपलब्ध करून देण्याबाबत

(३४) * २८२८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महत्वाकांक्षी अंत्योदय योजना नियमित सुरू ठेवून राज्यातील गरीब कुटुंबांना स्वस्त धान्य दुकानातून प्रतिमाह ३५ किलो धान्य उपलब्ध करून देण्याबाबत बल्लारपूरच्या लोकप्रतिनिधींनी मा.अन्न नागरी, पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांना दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ : (१) होय.

(२) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका ३५ किलो अन्नधान्य तर प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्य वितरीत करण्यात येते. १ किंवा २ सदस्यांसाठी ३५ किलो अन्नधान्य आवश्यकतेपेक्षा जास्त असून त्यांना अंत्योदय अन्न योजनेची शिधापत्रिका देणे उचित वाटत नसल्याने सदर लाभार्थ्यांना प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये वर्ग करून ५ किंवा त्यापेक्षा जास्त सदस्य असलेल्या कुटुंबाचा अंत्योदय अन्न योजनेमध्ये समावेश करण्याबाबत शासन पत्र दि.२१.९.२०१७ अन्वये सर्व क्षेत्रीय कार्यालयांना निदेश दिले आहेत. तसेच, सदर कार्यवाही करताना मा.न्यायालयांच्या कोणत्याही आदेशांचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत दि.२४.१०.२०१७ च्या शासन पत्रान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

दि.८.१.२०२० च्या शासन पत्रान्वये अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिकांवरील सदस्य प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये वर्ग करण्याबाबत सुधारीत सूचना देण्यात आल्या असून त्यानुसार दि. १७.७.२०१३ च्या शासन

निर्णयान्वये अंत्योदय अन्न योजनेकरिता पात्र ठरविण्यात आलेल्या व्यक्ती/कुटुंबांव्यतिरिक्त इतर व्यक्ती/कुटुंबांना वितरीत करण्यात आलेल्या अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिकांकरीता दि.२१.९.२०१७ व दि.२४.१०.२०१७ च्या शासन पत्रांमधील सूचनांनुसार कार्यवाही करण्याबाबत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागात टँकरद्वारे शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

(३५) * ६४०१ श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागातील गावांना शुध्द पाण्याचा पुरवठा टँकरने करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिले असल्याचे दिनांक १८ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी टँकरने पाणी पुरवठा करतांना क्लोरोस्कोप या प्रायोजिक उपकरणाच्या माध्यमातून पाण्याचे शुध्दीकरण तपासण्यात यावे असे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळी भागातील गावांना पिण्याच्या पाण्याचे टँकरद्वारे वितरण होत असतांना पाण्याची शुध्दता तपासण्यात येत नसल्याने व आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, सोलापूर व जि.प. मुख्याधिकारी सोलापूर यांच्या आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्यांवर तसेच दुषित पाणी पुरवठा करणाऱ्या टँकर पाणी पुरवठादारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) हे खरे आहे.

दिनांक २०.०५.२०१९ रोजी परिपत्रकान्वये विभागीय आयुक्त, पुणे यांनी पाणी टंचाई कालावधीत टँकरद्वारे पाणी पुरवठा करताना अवलंब करावयाच्या कार्यपद्धतीबाबत सूचना दिल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक ०६.०६.२०१९ रोजी सदर सूचनांच्या अनुपालनाबाबत संबंधिताना सूचित केले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

टँकरने पाणी भरण्याच्या सर्व ठिकाणी प्रत्येक टँकरच्या खेपावेळी क्लोरोस्कोपद्वारे ओ.टी. टेस्ट घेण्यात आलेली आहे व सर्व टेस्ट पॉझिटिव्ह आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर पिण्याच्या पाण्यामुळे कोणत्याही प्रकारचे दुष्परिणाम झालेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मानव विकास सेवेच्या बसेसमधून केवळ विद्यार्थीनींनाच प्रवास करण्यास मान्यता मिळण्याबाबत

(३६) * ७४१४ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील मुलींना शहरांमध्ये शिक्षणासाठी ये-जा करण्याची सुविधा व्हावी तसेच त्यांची सुरक्षाही व्हावी यासाठी शासनाने स्वतंत्र मानव विकास बस सेवा सुरू केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बसमधून केवळ विद्यार्थीनींनीच प्रवास करणे अपेक्षित असताना गटशिक्षणाधिकारी, पाथरी (जि.परभणी) यांनी विद्यार्थ्यांनाही प्रवास करण्याची मुभा देणारे पत्र आगार व्यवस्थापक, पाथरी यांना पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे पाथरी तालुक्यातील बारा मार्गावर धावणाऱ्या मानव विकासच्या बसेसमध्ये प्रवास करणाऱ्या सुमारे सातशे विद्यार्थिनींची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थीही या बसमधून प्रवास करू लागल्यामुळे बहुतांशी विद्यार्थिनींना बसमध्ये उभे राहून प्रवास करावा लागत असल्याचे तसेच मुलींच्या छेडछाडीच्या घटनाही वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या बसमधून केवळ विद्यार्थीनींनाच प्रवास करण्यास परवानगी देण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१) होय.

(२) होय. या आशयाचे पत्र तत्कालीन गट शिक्षणाधिकारी यांनी दिले होते. तथापि, विद्यमान गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पाथरी यांनी मानव विकास अंतर्गत सुरु असलेल्या बसेस मध्ये केवळ विद्यार्थीनींना (मूलींना) प्रवास करु देण्यात यावा. तसेच मानव विकास अंतर्गत बसेस मधील सर्व जागा या मुलींसाठी आरक्षित केलेल्या आहेत अशी सूचना बसेस मध्ये लावण्यात यावी, असे आगार प्रमुख, पाथरी यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पर्यावरणविषयक नियमांचे नगरपालिका व महानगरपालिका पालन करीत नसल्याबाबत

(३७) * ६५०६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पर्यावरणाचे संरक्षण व्हावे व मलनिस्सारण वाहिनी मधून होणाऱ्या जलप्रदूषणासंदर्भातील नियमांचे राज्यातील बहुतांश नगरपालिका व महानगरपालिका पालन करीत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाकडून अशा नियम मोडणाऱ्या नगरपालिका व महानगरपालिका यांना करोडो रुपयाचा आर्थिक दंड देऊनही अद्याप आवश्यक ती कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह राज्यातील सर्व नगरपालिका व महानगरपालिका यांना मलनिस्सारणावर १००% प्रक्रिया करण्याकरिता शासनाकडून नियमावली तयार करणे तसेच जनतेच्या करातून आलेल्या उत्पन्नाचा विचार करून आर्थिक दंड न लावता संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे : (१) व (२) हे अंशत: खरे आहे. राज्यातील २७ महानगरपालिकांपैकी १९ महानगरपालिका, २३९ नगरपालिकांपैकी १५ नगरपालिका व १२५ नगरपंचायतीपैकी २ नगरपंचायती जलप्रदूषण संदर्भातील नियमांचे पालन करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) राज्यातील सर्व नगरपालिका व महानगरपलिकाना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सानेगाव (ता.रोहे, जि.रायगड) येथील इंडो एनर्जी उद्योग प्रकल्पामुळे वायु प्रदुषण होत असल्याबाबत

(३८) * ३६८९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सानेगाव (ता.रोहे, जि.रायगड) येथील इंडो एनर्जी उद्योगाकडून जेटीवर अनेक वर्षे उतरवण्यात येणाऱ्या दगडी कोळसा व पिवळ्या गंधकातून निर्माण होणाऱ्या विषारी वायूमुळे पर्यावरणाला धोका निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या वायु प्रदुषणामुळे ग्रामस्थ तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असून शेती व मासेमारी व्यवसाय धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वायू प्रदुषणास कारणीभूत ठरलेल्या प्रकल्पांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे : (१) हे खरे नाही.

(२) सहाय्यक मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी यांनी सदरील तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने मासेमारी व्यवसाय धोक्यात आल्याबाबत त्यांच्या कार्यलयास कोणतेही निवेदन अप्राप्त आहे असे दि.२६.०२.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच, तालुका कृषि अधिकारी यांनी शेती व्यवसाय धोक्यात आला आहे किंवा कसे याबाबतचे निवेदन अप्राप्त आहे असे दि.२७.०२.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.

वायु प्रदुषणामुळे ग्रामस्थांचे व शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबतचा अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी अलिबाग यांच्याकडून दिनांक ०३.०३.२०२० रोजीच्या पत्राने प्राप्त झाला आहे. त्यानुसार उपकेंद्र यशवंतखार व प्राथमिक आरोग्य केंद्र येथे जानेवारी २०२० पासून वायू प्रदुषणाने कोणीही रुग्ण बाहयरुग्ण व आंतररुग्ण उपचाराकरिता आलेले नाहीत.

(३) मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दि.२३.०१.२०२० रोजी पाहणी केली असता, पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर उद्योगास दि.३०/०१/२०२० रोजी प्रस्तावित निर्देश पारित केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **राजेंद्र भागवत**

मुंबई. **सचिव (कार्यभार),**

महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.